# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Mo. No. - 8888282463

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्र. No.GU/NSS/ 8357/2019 Dt: 26/08/2019

प्रति,

मा. प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय:**— दिनांक २९ ऑगष्ट २०१९ रोजी सुदृढ भारत (Fit India) अभियानाची कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ:— १) क्रमांक रासेयो २०१९/प्र.क्र.११५/१९/साशी—७, दिनांक २३ ऑगष्ट २०१९

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये आपनास कळविण्यात येते की, मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांच्या व्दारे दिनांक २९ ऑगष्ट २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता होणाऱ्या सुदृढ भारत (Fit India) या अभियाना बाबत मा. केंद्रीय मंत्री, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली सुदृढ भारत (Fit India) अभियान राबविण्यात येत आहे.

करीता आपल्या महाविद्यालयांमध्ये दिनांक २९ ऑगष्ट २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता सलग्नीत पत्रानुसार सुदृढ भारत (Fit India) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. तसेच शपथ ग्रहण करण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर आयोजीत करावा व याचा अहवाल रासेयो विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे सादर करावे.

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

क्रमांक : रासेयो २०१९/प्र.क्र. ११५/१९/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- २३ ऑगस्ट, २०१९.

प्रति,
सर्व कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
सर्व विदयापीठे, संचालनालये.
राष्ट्रीय सेवा योजना.

विषय :- मा. प्रधानमंत्री यांच्याद्वारे दि.२९.०८.२०१९ रोजी होणाऱ्या **"सुदृढ भारत" ( Fit India ) अभियाना** बाबत कार्यवाही करणे...

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग/साशि-७ यांनी सादर केलेल्या टिपणीवरील मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे निर्देश.

महोदय,

मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांच्याद्वारे दिनांक २९.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) अभियाना बाबत मा. केंद्रीय मंत्री, युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली दि. २३.०९.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजीत केलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये दिलेल्या सूचनांनुसार विभागाने कार्यवाही करावी, यासाठी मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. दि.२९ ऑगस्ट, २०१९ रोजी होणाऱ्या "सुदृढ भारत" ( Fit India ) अभियानामध्ये प्रत्येक महाविदयालयातील प्रवेशीत विदयार्थी सहभागी होतील, यासाठी विभागाने प्रयत्न करणे.
२. विदयापीठे, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, स्वायत्त् संस्था, निमशासकीय संस्था इत्यादी सर्वांनी आपल्या संस्थेमध्ये दूरचित्रवाणी संच (T.V.) उपलब्ध करुन विदयार्थ्यांना उपस्थित रहाणेबाबत विभागाकडून परिपत्रक निर्गमित करावे. (संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना, विदयार्थी विकास मंडळ इत्यादी)
३. महाविदयालयांमध्ये जिमखाना विभाग व जिमनॅशियम क्लब यांचा कृती आराखडा तयार करुन विदयार्थ्यांना अधिकाधिक सुदृढ व निरोगी राहण्यासाठी प्रवृत्त करणे व सुविधा पुरविणे.
४. महाविदयालयांमध्ये विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धांचे तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ व्यक्तींचे व्याख्याने तसेच आरोग्य शिबिरांचे आयोजीत करणे.
५. "युवा जागरुक हो" या मथळयाखाली (Tag line) समाजाला, कुटुंबाला संदेश देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच प्रचार व प्रसार या माध्यमाचा वापर करुन जास्तीत जास्त लोकांमध्ये "सुदृढ भारत" ( Fit India ) साठी जागरुकता निर्माण करणे.
६. युवकांना आपल्या व्यक्तिमत्वाकडे अधिक लक्ष देता यावे, यासाठी योगा, साहसी क्रिडा स्पर्धा, धावण्याच्या शर्यती इ. गोष्टींवर लक्ष केंद्रीत करणे.

तरी वरील सूचनांनुसार दि. २९.०८.२०१९ रोजी सकाळी १०:०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. तसेच शपथ ग्रहण करण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर आयोजीत करावा व त्याचा कार्योत्तर अहवाल या कार्यासनाकडे तात्काळ सादर करण्यात यावा.

आपला विश्वासू,

(डॉ. अतुल हं. साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष.